कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा, भीमा खो-यातील पूर आपत्ती नियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (MRDP) राबविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)**
**शासन निर्णय क्र. आव्यप्र-२०२४/प्र.क्र.३०/आव्यप्र-१**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दि. १३ मार्च, २०२४**

**प्रस्तावना:-**

कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा आणि भीमा नदी खो-यातील भविष्यातील आपत्ती निवारण्यासाठी क्षमता बांधणी करणे आणि पूर व अन्य धोके क्षमविण्यासाठी अनुकूल योजना आणि पूर नियंत्रण व्यवस्थापन बळकट करणे, वातावरणीय बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी संस्थात्मक क्षमता वाढविणे, दुष्काळ आणि पूर व्यवस्थापनासाठी नियोजन आणि विज्ञानावर आधारित माहितीपूर्ण निर्णय घेऊन जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम ( Maharashtra Resilience Development Program ( MRDP ) प्रकल्प राबविण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा आणि भीमा नदी खो-यातील भविष्यातील आपत्ती निवारण्यासाठी क्षमता बांधणी आणि पूर व अन्य धोके क्षमविण्यासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने प्रकल्प राबविण्याबाबत शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रकल्पाची रुपरेषा खालीलप्रमाणे आहे. :-

१) **धोक्याची माहिती असलेले जलस्त्रोत व्यवस्थापन.**

(अ) जलाशयाच्या कार्यान्वयनासाठी भविष्य सूचना कार्यपध्दती असलेली एकात्मिक गतीशील निर्णय समर्थन प्रणाली.

(ब) राज्य आपत्कालिन ऑपरेशन केंद्र आणि जिल्हा आपत्कालिन ऑपरेशन केंद्रे तसेच पूर्वसूचना आणि हायड्रोमेट प्रणालीचे बळकटीकरण.

२) **पूर नियंत्रण गुंतवणूक.**

(अ) पूरामुळे आपत्तीजनक परिस्थिती ओढवू नये म्हणून कोल्हापूर व सांगलीमध्ये करावयाची उपाययोजना उदा.नदीचा प्रवाह वाढविण्यासाठी पाण्याचा निचरा आणि पाणी वाहून जाण्यातील अडथळे दूर करणे.

(ब) स्पंज सिटी सारख्या नाविन्यपूर्ण उपाययोजना सुरु करणे.

(क) निसर्ग आधारीत बहुउद्देशिय मैदान/जलाशय अशी उपाययोजना .

३) **संस्थात्मक क्षमता बांधणी.**

(अ) धोक्याची माहिती असलेल्या जलस्त्रोत व्यवस्थापनासाठी नॉलेज लाईट हाऊस/सेंटर फॉर एक्सलन्स ची स्थापना

(ब) धरणातील जलसाठा परिचालनासाठी धोरणात्मक मार्गदर्शक सूचना.

४) **विश्लेषण.**

(अ) कृष्णा भीमा जल हस्तांतरण प्रकल्पासह पाणी वळविणे आणि पूर नियंत्रणाद्वारे पाण्याच्या वापराची व्यवहार्यता याचा अभ्यास करणे.

५) **जोखीम वित्त पुरवठा आणि खाजगी भांडवलाची गतीमानता -**

(अ) जोखीम वित्त पुरवठा जसे की, शहरी समुहासाठी पूर विमा.

**प्रकल्प राबविण्याचा कालावधी खालीलप्रमाणे आहे. :-**

| अ.क्र | उपक्रम | कार्य कालावधी | एकूण कालावधी |
|---|---|---|---|
| १ | सर्वेक्षण,अन्वेषण आणि मुना | ६ महिने | ६ महिने |
| २. | अभ्यास तार्किक निष्कर्ष, डिझाईन्स, ड्रॉईंग व सविस्तर प्रकल्प अहवाल निश्चित करणे. | ६ महिने | १२ महिने |
| ३ | निविदा काढणे आणि यंत्रणांची नियुक्ती | ३ महिने | १५ महिने |
| ४ | प्रत्यक्ष कामाची सुरुवात आणि ते पूर्ण करणे करणे | २१ महिने | ३६ महिने |

**प्रकल्पासाठी अर्थसहाय्य :-**

हा प्रकल्प एकूण 400 US $ मिलियनचा आहे. (रु.३२०० कोटी) त्यापैकी या प्रकल्पासाठी जागतिक बँकेकडून 280 US $ (रु.२२४० कोटी) मिलियनचे अर्थसहाय्य मागितले आहे. उर्वरित ३० टक्के निधी म्हणजे १२० US $ मिलियन (रु.९६० कोटी) राज्य शासनाच्या निधीतून खर्च करण्यात येईल.

सदर प्रकल्प हा जलसंपदा विभाग व आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग यांच्यातर्फे राबविण्यात येणार आहे. जलसंपदा विभाग व आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग हे राज्याच्या निधीतून अंदाजपत्रक तयार करून संयुक्तपणे त्या त्या विभागाच्या प्रकल्प किमतीच्या प्रमाणात व्याजाची प्रतिपुर्ती करतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२४०३१५१८०२२८४०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

HITENDRA
YADAORAO DUFARE

Digitally signed by HITENDRA YADAORAO DUFARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=1170c73752038d1c4f8b3a8c1729f3f55bd8bd13206eed4aead71a63b3f1dcee, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=02BBA6FFE202C222698F7E91A562A124096291549EBA836EE89EC11CB9F688D5, cn=HITENDRA YADAORAO DUFARE
Date: 2024.03.15 18:11:53 +05'30'

**(हि.या.दुफारे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत** -

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा . मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव ,विधान भवन, मुंबई.
४)मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे सचिव, विधान भवन मुंबई
५)मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा /विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
६)सर्व मा. मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७)मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
८)मा. अप्पर मुख्य सचिव /प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय .विभाग सर्व
९) आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागातील सर्व कार्यासने
१०) निवड नस्ती/आव्यप्र-१.